॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२४-२५/ ३०४७ दिनांक :१५/११/२०२४

## अंध व बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना

प्रति,
मा.प्राचार्य, केंद्रप्रमुख व समन्वयक,
सर्व संलग्नित महाविद्यालय/परीक्षा केंद्र,
जिल्हा/तालुका मूल्यांकन केंद्र,
हिवाळी-२०२४ परीक्षा, प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षेत बसणा-या अंध व बहुविकलांग विद्यार्थ्यासाठी परीक्षा देण्याबाबत, उत्तरपुस्तिकेचे मूल्यांकनाबाबत सोयी-सुविधा.**

महोदय,

उपरोक्त परिपत्रकान्वये सर्व संबंधीतास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नित महाविद्यालयातील सर्व पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशीत अंध व बहुविकलांग विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासंबंधी व संबंधीताच्या उत्तरपुस्तिकांच्या मूल्यांकनाबाबत द्यावयाच्या सोयी-सुविधा खालील प्रमाणे आहे.

०१. अंध व अपंग विद्यार्थ्यांची परीक्षेकरता बैठक व्यवस्था तळ मजल्यावर करण्यात यावी.

०२. अंध व अपंग परीक्षार्थी पेपर लिहिण्यास असमर्थ आहेत त्यांना लेखनिक वापरण्यास परवानगी देण्यात यावी व लेखनिक पूरविण्यात आला असेल तरच परीक्षेकरीता अर्धातास वेळ वाढवून देण्यात यावा.

०३. अंध व अपंग विद्यार्थ्यांना सोईनुसार जवळचे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात यावे. शक्य तोवर ज्या महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे किंवा घराजवळचे महाविद्यालय परीक्षा केंद्र असावे. सर्व प्रकारच्या दीव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिका पी.डब्ल्यु.डी. शिक्का मुद्रित करून तपासणी करीता वेगळया ठेवण्याची व्यवस्था करावी.

०४. ज्या महाविद्यालयात पदवी/पदव्युत्तर/व्यावसायिक अभ्यासक्रमांना अंध व अपंग विद्यार्थ्यानी प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात परीक्षा देण्याची सुविधा विद्यापीठाने दिलेली आहे. संबंधीत विद्यार्थी कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे. त्या अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार आवश्यक असणा-या प्रश्नपत्रिका पाठविण्याबाबत विद्यापीठास कळवावे. जेणे करून त्या विद्यार्थ्यांची प्रश्नपत्रिका संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या इमेलवर पाठविण्यात येईल.

०५. अंध व अपंग विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या उत्तरपुस्तिका मूल्यांकन केंद्रावर न पाठविता त्याच महाविद्यालयातील शिक्षकांकडून मूल्यांकन करून गुण यादी व उत्तरपुस्तिका विद्यापीठाकडे सादर करण्यात यावी.

०६. अंध, अपंग व दीव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्तरपुस्तिकेचे मूल्यांकन करतांना स्पेलिंग, व्याकरण, विराम चिन्हे न दिल्यास याबाबतीत गुण दान कमी करण्यात येवू नये.

०७. अंध विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान गणितीय पाटीचा वापरण्यास परवानगी देण्यात याव्या.

०८. अंध विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधीत आवाजाच्या गणक यंत्राचा वापर करण्यास परवानगी देण्यात यावी.

०९. अंशत: अंध विद्यार्थ्यांना उत्तरपुस्तिका लिहिण्यासाठी स्केचपेनचा व प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी ग्लास मॅग्नीफायरचा वापर करण्यास परवानगी देण्यात यावी.

**श्री.एच.एस. साबळे**
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
मा.कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ